



दैनिक

लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

LOK AARAMBH



प्रतिनिधी नेमणे आहे.

बीड आंबेजोगाई गेवराई वडवणी केज परळी पाटोदा शिरूर कासार धारूर आष्टी माजलगाव इच्छुकाने संपर्क साधावा

९४०३६ ४१४८२

राहुल मारोतीराव वाईकर



dainiklokaarambh@gmail.com

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले



बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | रविवार ८ डिसेंबर २०२४ | अंक ३६४ • पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु


## पुष्पा २ने तोडले रेकॉर्ड; पहिल्याच दिवशी ३०० कोटींची कमाई



गोकुळ इंगोले : पुष्पा झुकेगा नहींपण मन वळवणार हे नक्की. अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्ना स्टारर मपुष्पा २ ने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई कमाई आहे. या चित्रपटाने रिलीजच्या पहिल्याच दिवशी मोठ्या चित्रपटांचे रेकॉर्ड उद्धस्त केले आहेत. पुष्पा २फच्या झंझावातापुढे ऑस्कर विजेत्या चित्रपट आरआरआरनेही शरणागती पत्करली आहे. सगळीकडे फक्त मपुष्पा २ चे नाव ऐकू येत आहे. भारतीय सिनेसृष्टीच्या इतिहासात जे काही इतर चित्रपट करू शकले नाही, ते या चित्रपटाने केले आहे. अल्लू अर्जुनच्या चित्रपटाने जगभरात आपली छाप पाडली आहे. याने पहिल्याच दिवशी जगभरात ३०० कोटी रुपयांची कमाई केली आहे. हे आकडे ऐकल्यानंतर अल्लू अर्जुन आणि दिग्दर्शक सुकुमार यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

# आमच्यासोबतही तेच घडलं, लोकसभेतील आकडेवारी देत

## देवेंद्र फडणवीस यांचं शरद पवारांना चोख प्रत्युत्तर

कोल्हापूरमध्ये बोलताना राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीत झालेल्या मतदानाची आकडेवारी देत काही प्रश्न उपस्थित केले होते. काँग्रेसला विधानसभा निवडणुकीत ८० लाख मतं पडली तरी त्यांच्या १६ च जागा आल्या आणि शिवसेना शिंदे गटाला ७९ लाख मतं पडली काँग्रेसपेक्षा एक लाख कमी मत पडली तरी त्यांच्या ५७ जागा आल्या असं शरद पवार यांनी म्हटलं आहे. यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकसभेला झालेल्या मतदानाची आकडेवारी देऊन चोख प्रत्युत्तर दिलं आहे. फडणवीसांनी ट्विट करत प्रत्युत्तर दिलं आहे.



### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

श्री शरद पवार साहेब, आपण ज्येष्ठ नेते आहात, किमान आपण तरी देशातील जनतेची दिशाभूल करू नका. जास्त मतं मिळूनही कमी जागा कशा? चला २०२४ लोकसभेत काय झाले ते पाहू, भाजपाला मतं १,४९,१३,९१४ आणि जागा ९, पण काँग्रेसला मतं ९६,४१,८५६ आणि जागा १३. शिवसेनेला ७३,७७,६७४ मतं आणि ७ जागा, तर राष्ट्रवादी-शरद पवार गटाला ५८,५१,१६६ मतं आणि ८ जागा. २०१९ च्या लोकसभेचे उदाहरण तर फारच बोलके आहे. काँग्रेसला ८७,९२,२३७ मतं होती आणि १ जागा मिळाली, तर तत्कालीन राष्ट्रवादीला ८३,८७,३६३ मतं होती आणि जागा ४ आल्या. पराभव स्वीकारला तर यातून लवकर बाहेर याल! तुम्ही तरी आपल्या सहका-यांना आत्मपरीक्षण करण्याचा सल्ला द्याल, अशी अपेक्षा आहे.

## अश्रूंची झाली फुले.

दुःखांची होती दलदल
जातीभेदाचा चिखल
त्यात उमलले कमळ
दलदल,चिखल दूर करून
हा सुर्य अस्तास गेला...

पोटास देऊन चिमटे
विरोधाचे टोचले काटे
संकटांना झुंजले नेटे
भेदभावाचे जाळे दूर करून
हा क्रांतीसुर्य अस्तासी गेला...

जीवनात होता अंधार
नाही घेतला माघार
दीनदुबळ्यांना दिला आधार
भीमराय तुमच्यामुळे
अश्रूंची झाली फुले...

सुरेश शिर्के
खारघर,पनवेल

# बॅलेट पेपरवर मतदान करण्यासाठी गावाला बंदी का? कोणता कायदा आहे?; शरद पवार संतापले



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख नेते शरद पवार यांनी आज मारकडवाडीतील लोकांकडून बॅलेट पेपरवर मतदान घेत असताना केलेल्या कारवाईच्या विरोधात प्रश्नचिन्ह उपस्थित केला. शरद पवार म्हणाले की, ङ्गमी उद्या मारकडवाडीत जातोय. त्या लोकांशी बोलणार आहे. उत्तम जानकर काय आणि या ठिकाणचे दोन्ही उमेदवार पाहा. त्यांच्या सभा पाहिल्या. गेल्या ४० ते ५० वर्षापासून मी सभा करतोय. यांच्या सभा पाहिल्यावर निकाल काय लागणार हे सांगण्यासाठी ज्योतिषाची गरज नाही. वातावरण अनुकूल होतं. पण निकाल अनुकूल नाही. पण जोपर्यंत अधिकृत माहिती नाही तोपर्यंत बोलणार नाही.मारकडवाडीतील लोकांचं मत जाणून घेणार ङ्गराहुल गांधी येणार असल्याबाबत वाचनात आलं. पण नक्की माहीत नाही. ते येत आहेत असं सांगितलं जात आहे. ईव्हीएमवर संशय व्यक्त केला नाही. माझ्याकडे ऑथेंटिक माहिती नाही. मी फक्त आकडेवारी सांगितली आहे. निवडणूक होऊन गेली होती. गावच्या लोकांनी एक पद्धत अवलंबली. जुन्या पद्धतीने मतदान करावं हे त्यांनी ठरवलं. बॅलेट पेपरवर त्यांना बंदी का? कोणता कायदा आहे. त्या ठिकाणी १४४ कलम लावलं? त्याचं कारण काय. मला आश्चर्य वाटलं. म्हणून मी म्हटलं तिकडे जाऊनच येऊ. लोकांचं मत जाणून घेऊ. अधिका-यांशी बोलू. जयंत पाटील आणि इतर काही लोकं माझ्यासोबत येणार आहेत.फ अशी माहिती त्यांनी दिली. एकत्र लढणार ङ्गआम्ही एकत्रपणे स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकीत एकत्र जाणार आहोत. निवडणुकीत अप आणि डाऊन येत असतो. त्यामुळे निराश व्हायचं नसतं. १४ निवडणुका पाहिल्या. कधी पराभव पाहिला नाही या निवडणुकीत पराभव झाला. पण तरीही निराश व्हायचं नाही. लोकांमध्ये जायचं असतं. लोकांमध्ये गेलं पाहिजे.फ असं ही शरद पवार म्हणाले. मविआतून सपा बाहेर समाजवादी पक्षाचे नेते अबू आझमी यांनी आपण महाविकासआघाडीतून बाहेर पडत असल्याचं सांगितलं. त्यांनी ठाकरे गटावर हिंदुत्वाचा अंजेडा राबवत असल्याचा आरोप केला आहे. त्यावर बोलताना शरद पवार म्हणाले की, समाजवादी पार्टीबाबत माहिती घेतो. सपाच्या राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्यांचा आग्रह एकत्र राहण्याचा आहे.

# शालेय क्रीडा स्पर्धेबाबत सोमवारी बैठक

बीड, दिनांक ०७ : जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धेसाठी क्रीडा संघटनांची सोमवारी (ता.०९) दुपारी एक वा. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सबंधित खेळ संघटनांच्या प्रमुखांनी कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

आष्टे डू आखाडा, युनिफाईट, कुडो, स्पीडबॉल, टेंगसुडो, फिल्ड आर्चरी, सुपर सेव्हन क्रिकेट, बेल्ट रेसलिंग, टेनिस व्हॉलीबॉल, लगोरी, बीच व्हॉलीबॉल, टेनिस क्रिकेट, टेबल सॉकर, ग्रॅपलिंग, पॅन्टाक्यु, लंगडी, स्पोर्ट डान्स, संगीत खूर्ची, मॉन्टेक्स बॉल क्रिकेट, मिनी गोल्फ, फ्लोअर बॉल, थायबॉक्सिंग, हाफकिडो बॉक्सिंग, वुडबॉल, पॉवर लिफ्टिंग, टॉर्गेट बॉल, कॉर्फबॉल, ड्रॉपरो बॉल, चॉकबॉल, फुटबॉल टेनिस, वुडो, रोपस्किपींग, सिलंबम, थांग ता मार्शल आर्ट, कुराश, रस्सीखेच, जीत कुने दो, हुप क्वांन दो, युग मुन दो, वोवीनाम, जंप रोप, टेनिस बॉल क्रिकेट आदी खेळ संघटनांच्या प्रमुखांनी आवश्यक माहिती विहित वेळेत सादर केल्यानंतरच संबधित खेळाच्या जिल्हास्तर, विभागस्तर शालेय क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन निश्चित करण्यात येणार आहे.

खेळाच्या अधिकृत राज्य संघटनेची जिल्हा संघटनेला मान्यता असल्याचे पत्र, धर्मादाय आयुक्त यांच्याकडील प्राप्त संघटनेचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत, संघटनेच्या कार्यकारणीची यादी त्यांच्या पत्ता आणि संपर्क क्रमांकासह, खेळाबाबतची माहिती जसे खेळ सांघिक आहे, की वैयक्तिक, खेळाडू संख्या वजनगट, खेळाची नियमावली व इतर आवश्यक माहिती, जिल्हास्तर स्पर्धेचे आयोजन स्वबळावर (तांत्रिक आणि आर्थिक) करण्यास तयार असल्याचे हमीपत्र आदी कागदपत्रे खेळ संघटनांच्या प्रमुखांनी बैठकीस येताना सोबत आणावे, असेही त्यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

## लाडकी बहीण योजना ही बंद होणार नाही

लाडकी बहीण योजनेबाबत बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, लाडकी बहीण योजना ही बंद होणार नाही. ही योजना पुढेदेखील सुरूच ठेवली जाईल. त्यात वाढ करून २१०० रुपये दरमहा दिले जातील. पण त्यासाठी बजेटच्या वेळी आम्ही तसा विचार करू. राज्यातील सर्व आर्थिक स्रोत यांचा अभ्यास करून आणि विचार करूनच अशा प्रकारचे निर्णय घेतले जाऊ शकतात. त्या प्रकारे योग्य पद्धतीने निर्णय केले जातील. २१०० रुपये देण्याचा निर्णय पक्का आहे. जी आश्वासने दिली आहेत, ती नक्कीच पूर्ण करू. त्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी ज्या तरतुदी करण्याची गरज आहे, ती आपण करू आणि जे लोक निकषाच्या आत बसतील, त्यांना योजनांचा लाभ नक्कीच होईल. कोणीही वंचित राहणार नाही, असे देवेंद्र फडणवीस नमूद केले.

## वाय एस सी एल क्रिकेट लीग दिल्ली बेस कॅम्प साठी ओशन क्रिकेट अकॅडमी च्या ५ मुलांची निवड



पाटोदा प्रतिनिधी :- दिल्ली येथे आयोजित क्रिकेट च्या नामांकित साखळी स्पर्धेत पहिल्या फेरीत दमदार कामगिरी करत प्रशिक्षक डॉ सुशिल तांबे यांच्या ओशन क्रिकेट अकॅडमी पाटोदा व जामखेड येथील पाच मुलाची दिल्ली येथे होणा-या वाय एस सी एल लीगच्या बेस कॅम्प साठी निवड झाली. लीगच्या पहिल्या राऊंड मध्ये जबरदस्त कामगिरी करत दर्शन कडभाने, आयुष कस्तुरे, कार्तिक डोंगरे, आदित्य जायभाये व सार्थक गोपाळ घरे यांनी आपले बेस कॅम्प मधले स्था न पक्के केले. बेस कॅम्प मध्ये चांगली कामगिरी करून लीग मध्ये खेळण्याचे द्वार खुले होईल. लीग मध्ये ५० हजार ते १० लाखांपर्यंत स्कॉलरशिप खेळाडूला मिळतात. मुलांनी चागली कामगिरी करावी व जिल्ह्याचे व गावचे नाव देशात गजवावे. मुलांचे या कामगिरी साठी साठी सर्वत्र कौतुक होत आहे.

# दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्राचे ग्रहण सुटेना ; एकच वैद्यकीय अधिकारी असल्याने रूग्णांची हेळसांड

## वैद्यकीय अधिकारी नियुक्तीसाठी डॉ.उल्हास गंडाळ यांना निवेदन :- डॉ.गणेश ढवळे

पाटोदा:- ( दि.०७ ) पाटोदा तालुक्यातील दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील अडचणी कमी होण्याचे चिन्ह दिसेनात.दासखेडचे भुमिपुत्र आणि मुख्यमंत्र्यांचे तत्कालीन ओएसडी कृष्णा जाधव यांच्या पाठपुराव्यातुन तब्बल २ कोटी ६३ लाख रुपये खर्चून बांधण्यात आलेली प्राथमिक आरोग्य केंद्राची सर्व सुविधांनी सुसज्ज ईमारत पुढा-यांच्या श्रेयवादात उद्घाटनाच्या प्रतीक्षेत २ वर्षांपासून धुळखात पडुन होती. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.सरीता हजारे सहसंचालक आरोग्य सेवा (प्राआकें/उपकेंद्र/दवाखाने) मुंबई यांना लेखी तक्रार केल्यानंतर त्यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी बीड डॉ.उल्हास गंडाळ यांना उद्घाटनाची प्रतिक्षा न करता प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करण्याचे निर्देश दिले.त्यानंतर डॉ.उल्हास गंडाळ यांच्या आदेशाने दि.१ ऑगस्ट पासून दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आरोग्य सेवा सुरू झाली. त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी डॉ.पुजा माने आणि डॉ.शरयु पडोळे यांची नियुक्ती करण्यात आली. मात्र गेल्या ४ महिन्यांपासून केवळ डॉ.शरयु पडोळे याच आरोग्य सेवा देत असुन डॉ.पुजा माने या ४ महिन्यांपासून अद्याप रूजु झाल्याच नाहीत. सध्या कडाक्याच्या थंडीमुळे सर्दी, घसादुखी, श्वसन विकारांच्या रुग्णांत वाढ झाली असुन लहान मुलांसह वृद्ध नागरीक व महिला व पुरुष यांची भर पडली असुन एकाच वैद्यकीय अधिका-यांवर प्राथमिक आरोग्य केंद्राची मदार असल्याने रूग्णांना अडचणींचा सामना करावा लागत असुन तातडीने त्या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी डॉ.उल्हास गंडाळ जिल्हा आरोग्य आधिकारी बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे यांच्यावर अतिरिक्त शारीरिक व मानसिक ताण**

---

दासखेड प्राथमिक आरोग्य केंद्रात ४ शिपाई,१ आरोग्य सेवक,१ औषधी निर्माता,१ कनिष्ठ लिपिक,१ लॅब टेक्निशियन , मुख्यमंत्री लाडका भाऊ योजनेंतर्गत १ महिला आरोग्य सहाय्यक यांची पदभरती करण्यात आली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात दररोज ५०-६० रूग्ण तपासणीसाठी येतात. प्राथमिक आरोग्य केंद्रात कार्यरत असणा-या एकमेव वैद्यकीय अधिकारी डॉ.शरयु पडोळे यांच्यावर याचा शारीरिक व मानसिक ताण पडत आहे. तसेच काही कामानिमित्त रजा घेतली तर मात्र रूग्णांची अडचण निर्माण होऊन त्यांना उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सहन करत पाटोदा येथील रूग्णालयात जावे लागते.




**रूजू न झालेल्या डॉ. पुजा माने यांना अनाधिकृत गैरहजर प्रकरणी नोटीस पाठवली आहे ; वैद्यकीय अधिकारी नियुक्तीसाठी उपसंचालक आरोग्य सेवा यांना पत्रव्यवहार केला आहे :- डॉ. उल्हास गंडाळ ; जिल्हा आरोग्य अधिकारी बीड**

----

दासखेड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात नियुक्ती देण्यात आलेल्या डॉ.पुजा माने यांना दि.०७ मार्च पासुन कोणताही रजेचा अर्ज कार्यालयास सादर न करता अनाधिकृत रित्या गैरहजर राहिल्याने सेवा समाप्तीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात येईल व शिस्त भंग विषयक कारवाई करण्यात येईल अशी नोटीस बजावुन उपसंचालक आरोग्य सेवा परीमंडळ लातुर यांना कळविण्यात आले असुन लवकरच वरीष्ठांच्या आदेशाने प्राथमिक आरोग्य केंद्रात दुस-्या वैद्यकीय अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल व आरोग्य सेवेत अडचण येणार नाही असे डॉ.उल्हास गंडाळ यांनी डॉ.गणेश ढवळे यांना सांगितले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
रविवार ८ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



## फडणवीसांच्या नेतृत्वाखाली, विकास गतीमान होवा

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात ५ डिसेंबर २०२४ एक अविस्मरणीय दिवस म्हणून नोंद होईल. महाराष्ट्राच्या लाडक्या देवाभाऊंनी राज्याचे २१ वे मुख्यमंत्री म्हणून मुंबईच्या आझाद मैदानावर लक्षावधी जनसागराच्या साक्षीने शपथ घेतली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा तसेच विविध राज्यांतील भाजपाचे मुख्यमंत्री, अनेक केंद्रीय मंत्रीही या दिव्य-भव्य सोहळ्यास उपस्थित होते. या शानदार शपथविधी सोहळ्याने सन २०१४ च्या शपथविधी समारंभाची आठवण करून दिली. देवेंद्र पहिल्यांदा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, तेव्हाही असाच भव्य सोहळा आयोजित करण्यात आला होता. खरं तर २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांच्याच नेतृत्वाखाली भाजपा-शिवसेना युतीचे सरकार स्थापन करण्याचा राज्यातील मतदारांनी जनादेश दिला असताना उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्रीपदाच्या लोभापायी काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसशी घरोबा केला व देवेंद्र यांची राज्याच्या सिंहासनावर बसण्याची संधी हुकली. २०२४ मध्ये राज्यातील मतदारांनी राज्यात सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपाला निवडून दिले आहे. भाजपाने १४८ जागा लढवल्या, पक्षाचे १३२ आमदार विजयी झाले, शिवाय निवडून आलेल्या ५ आमदारांनी भाजपाला समर्थन जाहीर केले. त्यामुळे भाजपाच्या यादीवर आमदारांची संख्या १३७ झाली आहे. महायुतीत एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे ५७ व अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे ४१ आमदार निवडून आले आहेत. याचा अर्थ राज्याचा मुख्यमंत्री भाजपाचाच व्हावा असाच जनादेश जनतेने दिला आहे. एकनाथ शिंदे व अजितदादांनीही तो स्वीकारला आहे. देवेंद्र हेच महाराष्ट्रात भाजपाचे नंबर १ चे नेते आहेत. देवेंद्र यांना पक्षात कोणीही स्पर्धक नाही किंवा त्यांना पर्यायही नाही. त्यांचे संघटनकौशल्य आणि परिश्रम याला तोड नाही. गेली अकरा वर्षे त्यांनी भाजपाचा राज्यात पाया भक्कम केला व राज्यात पक्षाचा विस्तारही सर्वाधिक केला. त्यामुळेच देवेंद्र हेच राज्यातील पक्षाचे सर्वोच्च व शक्तिमान नेतृत्व आहे, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. विधानसभा निवडणुकीत महायुतीचे २३५ आमदार विजयी झाले आणि महाआघाडीला पन्नाशीही गाठता आली नाही. महायुतीच्या झोळीत मतदारांनी मतांचा वर्षाव करून पाच वर्षे सरकार चालविण्याचा जनादेश दिला आहे. त्यामुळेच आता आपले काय होणार, या भयगंडाने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेना या तीनही पक्षांना पछाडले आहे. खरे तर विधानसभा निवडणुकीच्या काळात आघाडीतील तीनही पक्षांना मुख्यमंत्रीपदाची स्वप्ने पडत होती. त्यातही उबाठा सेनेचे प्रमुख उद्धव ठाकरे हे तर महाआघाडीचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करा असे वारंवार सांगत होते. भाजपाशी युती असताना शिवसेनेचे पन्नास-साठ आमदार निवडून येत होते, आता काँग्रेसशी युती करून उबाठा सेनेचे जेमतेम २० आमदार निवडून आले आहेत. जर सत्ता नसेल तर आपल्या पक्षाचे काय होणार, पक्ष कसा वाढणार या चिंतेने उबाठा सेनेला घेरले आहे. महायुतीच्या नवीन सरकारमध्ये देवेंद्र फडणवीस यांची टीम कोण असणार याची सर्व राज्याला उत्सुकता होती व आजही आहे. भाजपात नव्याने कोणाला संधी मिळणार, तरुणांना किती प्रतिनिधित्व मिळणार याचे अंदाज व्यक्त केले जात होते. अजित पवारांनी आपण तर शपथ घेणारच, पण शिंदे यांचे मात्र आपल्याला ठाऊक नाही, असे वक्तव्य केल्याने शिंदे नाराज असल्याच्या चर्चेला आणखी तोंड फुटले. आपले मुख्यमंत्रीपद गमावल्याचे दुःख शिंदे यांना असणारच पण उपमुख्यमंत्री म्हणून गृहखाते मिळावे यासाठी त्यांचा आग्रह होता अशीही चर्चा होती. राजकारणात आपणहून काही मिळत नाही, खेचल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य करता येत नाही. पण शपथविधीच्या अगोदर चार तासांपर्यंत शिंदे उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार की नाही यावर माध्यमांवर सवंग चर्चाच चालू होती. महायुतीला जनतेने एवढा मोठा जनादेश दिल्यानंतर रुसवे- फुगवे शेवटच्या क्षणापर्यंत चालू राहणे हे योग्य झाले नाही. शपथविधीसाठी महायुतीतील तीनही पक्षांनी जी निमंत्रणे पाठवली, त्यावर शिंदे यांचे नाव नव्हते. उपमुख्यमंत्री म्हणून शिंदे शपथ घेतील असा कोणत्याही निमंत्रणावर उल्लेख नव्हता. ही बाब सुद्धा खटकणारी आहे. विधानसभा निवडणुकीत मिळालेला विजय जसा महायुतीचा आहे, तसाच मोदी-शहा यांचाही त्यात मोठा वाटा आहे, याची जाणीव शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसने ठेवली पाहिजे. महाघाडीचा नकारात्मक प्रचार व सत्तेसाठी नेत्यांमध्ये चाललेली चढाओढ जनतेला मुळीच आवडली नाही. दुसरीकडे महायुतीचा प्रचार हा विकासकामांचा अजेंडा घेऊन केला जात होता, लाडकी बहीण व ओबीसी यांना विश्वास देणारा होता. भाजपाचे हायकमांड हे दिल्लीत आहेत. मोदी-शहा यांचा शब्द अंतिम आहे. तसे शिवसेनेत एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये अजितदादांचा निर्णय अंतिम आहे. मात्र भाजपाबरोबर पेच निर्माण झाला तर या दोन्ही पक्ष प्रमुखांना मोदी-शहांचेच ऐकावे लागणार आहे. दिल्लीतील श्रेष्ठींकडे दुर्लक्ष करून महायुतीच्या मित्रपक्षांना भाजपाला अडचणीत आणता येणार नाही. महाराष्ट्राची तुलना जशी मध्य प्रदेश, हरियाणा किंवा छत्तीसगडशी होऊ शकत नाही तसेच बिहारशीही होऊ शकत नाही, याचे भान महायुतीतील घटक पक्षांनी ठेवले पाहिजे. तीनही पक्ष आणि तीनही पक्षांचे नेते एकत्र राहिले, त्यांनी आपली एकजूट कायम ठेवली, तर त्यांचे व महाराष्ट्राचे त्यात भले आहे. गेल्या अडीच वर्षांत महायुतीच्या सरकारने राज्यात विकासकामांचा धडाका लावला, लाडक्या बहिणींना मोठा आधार दिला, असा कामाचा धडाका यापुढे चालू राहावा हीच देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील नव्या सरकारकडून अपेक्षा आहे. लोकसभा निवडणुकीत झालेली चूक महाराष्ट्रातील मतदारांनी सुधारली आहे. देवेंद्र यांच्या नेतृत्वाखाली महायुतीच्या नव्या सरकारकडून महाराष्ट्राचा चौफेर व गतीमान विकास होईल, असा आम्हाला विश्वास आहे.

## प्राणी घरात पाळावेत का ?? शास्त्र काय सांगतं ??

दोन दिवसांपूर्वी मी सिंबा नावाच्या डॉगीवर लेख लिहीला होता.. तो वाचल्यावर पुर्वा नावाच्या वाचक सखीचा फोन आला होता.. त्यांना लेख आवडल्याचं त्यांनी सांगितले आणि त्यांच्या डॉगीबद्दल त्या अशा काही भरभरून बोलत होत्या ते ऐकून त्यांची थोडी काळजी वाटली.. प्रचंड प्रमाणात त्यांची अटॅचमेंटब दिसली.. एकच मुल असल्यामुळे त्यालाही डॉगीची सोबत झाली .. आणि आता नोकरीसाठी तो बाहेर गेलाय तर मलाही करमणूक होते.. पुर्वा मॅम सारखी अनेक मंडळी आहेत ज्याना शास्त्र माहीत नाही आणि निसर्गही कळला नाही त्यामुळे अशी मंडळी त्यांच्या स्वार्थापोटी प्राणी घरात पाळतात.. घरातील फरशी त्यांना चालत नाही.. त्यांना मोकळेपणाने जगायची सवय असते.. आपण घेउन जाऊ तेव्हाच ते बाहेर जाणार ..मुळात त्यांची जडणघडण निसर्गात होते.. त्यांचा आहार हाही निसर्गातच असतो.. त्यांची रहाण्याची जागा ही पण निसर्गात. त्यांना फरशीचा त्रास होतो.. ते खाऊन घरात बसल्यामुळे त्यांचं वजन वाढतं.. त्याचा त्यांच्या पायावर ताण येतो.. आपलं अन्न खाऊन त्यांना आजार होतात.. त्यांना मेडीसीन , इंजेक्शन याची गरजच नसते.. निसर्गाने त्यांची खाण्यापिण्याची सगळी सोय केली आहे .. त्यामुळे आपल्या इगोपायी आपण माणसाना दुर करतो आणि प्राणी घरात पाळतो आणि त्या प्राण्यात इतके इंव्हॉल्व्ह होतो की ज्याने सृष्टीची निर्मिती केली त्यालाच विसरतो आणि सतत प्राण्यांची नावेच घेत रहातो.. शास्त्र सांगतं , घरात माउ ,भुभु पाळणं म्हणजे पुढचा जन्म आपण त्याच जन्मात घेणार हे आपण ठरवुन टाकतो.. हे श्रीमद्भागवत मधे सांगितले आहे.. माझ्या मनाचं मी काहीही सांगत नाही.. भगवंताने प्रत्येकाची सोय केली आहे.. जसं काही जण म्हणतात , आपण मासे खाल्ले नाहीत तर त्यांची पैदास वाढेल पण तसं अजिबात नाही कारण प्राणी एकमेकांना खातात .. शाकाहार हे आपले अन्न आहे.. पण बाहेर दिसलेल्या प्राण्याला काही मदत लागली तर जरुर करा असही सांगितले आहे.. प्रेमानंद महाराज नेहमी त्यांच्या व्हीडीओमधे हे सांगतात.. जरुर ऐका.. गाय पाळा हेही तेआवर्जून सांगतात.. घराबाहेर एखाद्या प्राण्याला खायला द्या आणि त्यात जीव न अडकवता बाजूला व्हा.. जीव अडकवायचाच असेल तर तो फक्त भगवंतामधे अडकवा.. प्रेम करायचच असेल तर त्याच्यावर करा कारण मनुष्य जन्माचा एकमेव उद्देश म्हणजे भगवद्प्राप्ती.. भगवद्धामात जाऊन पुन्हा कुठल्याही जन्मात पृथ्वीवर न येणे याची तयारी आपल्या प्रत्येकाला करायची आहे.. कलियुगात त्यासाठी हरिनाम हेच श्रेष्ठ आहे.. सतत भगवंताच्या सानिध्यात राहून इतर गोष्टीपासून दुर राहिल्याने दुख अजिबात नाही.. मिळेल तर तो फक्त आनंद .. तुम्ही म्हणाल , फॉरेन मधे हा नियम नाही का ?? तिथे शास्त्र नाही का ??.. भगवंत सगळ्याचा एकच त्यामुळे कर्मानुसार सगळ्याना सारखीच फळं मिळणार आणि त्यानुसारच पुढचा जन्मही मिळणार.. उलट अशा लोकांचं किवा त्यांच्या कृतीचं अनुकरण करण्यापेक्षा भगवंताचं अनुसरण करा.. शास्त्र आणि निसर्ग जाणून घेउन माणसाना जवळ करा.. म्हणजे प्राणी घरात आणायची गरजच लागणार नाही.. आपण जसे वागतो तसंच समोरची व्यक्ती वागणार .. सगळेच आपल्या हातात असताना दोष इतरांना का ??.. पुन्हा एकदा विचार करा.... भगवद्गीतेतील आठवा अध्याय वाचा.. भगवंताचे आयुष्यभर स्मरण केल्याने विशेषकरुन मृत्यूसमयी स्मरण केल्याने मनुष्यला परमधाम प्राप्ती होते..

**सोनल गोडबोले**

## आमदार सुरेश धस यांना मंत्रीपद द्या : सोमा तोडकर

आष्टी,पाटोदा,शिरूर मतदारसंघात आ. सुरेश धस हे आष्टी विधानसभेच्या निवडणुकीत भूतो ना भविष्य असे विक्रमी मताधिक्याने निवडून आले असून जनसेवेत असलेले सर्वसामान्यांच्या अडीअडचणीच्या काळात सदैव तत्पर राहून त्यांच्या अडीअडचणी सोडविणारे नेतृत्व म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे. अडचणीच्या काळात मदतीला धाऊन जाणाऱ्या आ.धस यांना नव्याने होणाऱ्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रीपद देऊन पक्षश्रेष्ठींने न्याय द्यावा अशी मागणी मंगरूळ गावचे उपसरपंच सोमा तोडकर यांनी केले आहे. आष्टी पाटोदा शिरूर कासार मतदारसंघातील जनतेने





जातीपातीच्या राजकारणाला थरा न देता विधानसभा निवडणुकीत आ.सुरेश धस यांना बहूजन समाजाने ऐतिहासिक विजयी केले आहे.केंद्रात आणि राज्यात भाजपा मित्र पक्षाचे सरकार स्थापन करण्यासाठी आष्टी,पाटोदा,शिरूर मतदार संघातील जनतेने मोठा कौल दिला आहे.यामध्ये नवनिर्वाचित लोकनियुक्त आ.सुरेश धस यांचा सिहाचा वाटा आहे. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी नव्याने होत असलेल्या मंत्रिमंडळात संधी देऊन पक्षश्रेष्ठींनी न्याय द्यावा अशी मागणी मंगरूळ गावचे उपसरपंच सोमा तोडकर यांनी केले आहे.

# अगदी साधा विषय पण अनेकांना भान नसणारा.

## रिकाम्या हाती कोणाकडे का जाऊ नये ??

.... हरे कृष्ण.. अतिथी देवो भव: असं जेव्हा असतं आणि कोणीतरी आपल्याला घरी बोलावतो तेव्हा आपण रिकाम्या हाताने जाऊ नये.. आपल्याकडे द्यायला खुप गोष्टी असतात.. घरी केलेले छान पदार्थ असतात.. दारातील कडीपत्ता , भाजी , फळे असतात.. काही घरात विणलेल्या वस्तु असतात.. घरी केलेली पेंटींग असतात.. टाकावुतुन टिकाऊ अशा केलेल्या वस्तु असतात.. र्त्रीळीी.. वरींशी.. वीूर्षीळीी.. साखरेचे पदार्थ कोणी खात नाही तर गुळाचे पदार्थ न्यावेत..अशा अनेक गोष्टी आपण देउ शकतो.. खेड्यात गेलो तर पैसे देउ शकतो.. एखाद्याकडे दारात नारळाचं झाड असेल त्याने नारळ द्यावे.. सीझनमधे आंबे द्यावेत.. समोरच्याची अपेक्षा नसेलही पण प्रत्येकवेळी तुम्ही फक्त खायलाच जात असाल तर नंतर तुम्हाला टाळलं जातं.. एखाद्याने ४ वेळा काही दिले किवा चहा / कॉफी पाजली तर आपण दोन वेळा तरी करायला हवं.. एखाद्याचा घरुन निघताना त्यांना आपल्या घरी आवर्जून बोलवायला हवं.. त्यांच्या घरात कोणी वयस्कर मंडळी असतील त्यांच्या पाया पडुन त्यांची विचारपुस करावी.. सोबत कोणाला घेउन जाणे टाळा... आपण एखाद्याकडे पार्टीला जात असु तर सोबत आपले मित्र किवा नातेवाईक यांना नेउ नका.. कारण शहरात ठरावीक जागा आणि तेवढाच स्वयंपाक केलेला असतो आणि त्याहीपेक्षा एखाद्याला आवडतही नाही.. त्यामुळे ते आपल्याला पुन्हा बोलवणं टाळतात.. घराबाहेर बोलणे टाळा.. खुप जणाना सतत मोबाईलमधे चाळे करायची सवय असते किवा लिफ्ट बाहेर ,जिन्यात किवा त्यांच्या घरात मोठमोठ्याने फोनवर बोलणे या सवयीमुळे इतरांना त्रास होवु शकतो.. वेगळ्या अन्नपदार्थाची मागणी टाळा.. खुप जणाना सवय असते.. मी चहा / कॉफी घेत नाही.. सरबत करा किवा ज्युस इत्यादी.. किवा अमुक भाजी आवडत नाही .. हे नको ते हवं अशा मागण्या करणं कायम टाळायचे.. यावरुन एक किस्सा आठवला.. जवळपास १० वर्षापूर्वीची गोष्ट असेल .. आमचा नाटकाचा गृप नाशिकला गेलो होतो..माझ्या मित्राने आम्हाला सगळ्याना जेवायला बोलावलं.. त्याच्या घरात भरपूर माणसे होती.. शेतकरी कुटुंब होते.. त्यांनी अतिशय चवदार जेवण केलं होतं.. जेवायला बसल्यावर आमच्या गृपमधला एक जण म्हणाला , ताई दही हवय.. त्या दिवशी त्यांच्याकडे दही नव्हते..त्यांना बुचकळ्यात पडल्यासारखं झालं.. मान्य आहे तो रोज घरात दही खात असेल पण एखाद्या दिवशी नाही खाल्लं तर बिघडलं नसतं.. हा सेंस आपल्याला असायलाच हवा.. अजून एक किस्सा. माझ्या कोकणातील मित्राकडे मी माझ्या काही फ्रेंड्स ना घेउन गेले होते.. एका मित्राला रोज रात्री झोपताना कपभर दुध पिउन झोपायची सवय होती तर जाताना त्याने दुधाची पिशवी सोबत न्यायला हवी होती कारण कोकणातील मित्र तिथे कुटुंबासोबत रहात नसल्याने त्याच्याकडे कदाचित दुध नसेलही .. किवा एक दिवस दुध न पिता झोपल्याने काहीही फरक पडत नाही.. दुसऱ्याकडे गेल्यावर आपण आपल्या सवयी बदलायलाच हव्यात नाहीतर पुढच्या वेळी तुमचा पत्ता कट होतो.. . पाहुणचार झाल्यावर योग्य वेळी पाहुण्याकडुन निघणं हेही सुचायला हवं.. आपल्याला पुन्हा पुन्हा लोकांनी बोलवायला हवं असेल तर आपले वर्तन हे उत्तमच असायला हवे..

**सोनल गोडबोले**

# इथे ओशाळला मानवता धर्म

**हॉस्पिटल च्या वारेमाप वाढत्या बिलाकडे कोणाचे लक्ष आहे का? असेल तर ते नियंत्रणात कधी आणायचे? अगणित माणसे मेल्यावर का? बंद पडलेल्या पतसंस्था,बँका, यात डॉक्टर लोकांचे करोडो रुपये जे बुडले, तो बुडलेला पैसा आला कोठून?**

तपासनी फिस पासून ते पेशंट चे एखादे ऑपरेशन होऊन घरी येईपर्यंत येणारे हॉस्पिटल च्या बिलाचा आकडा पेशंट च्या नातेवाईकचे कंबरडे मोडूस्तर जीव जायची वेळ येते.हॉस्पिटल म्हणले की पैसा लागणारच.पण इतके महागडे ते ऑपरेशन,महागड्या शंभर तपासण्या, ५० वेळेस एक्सरे आणि हजारो रुपयाचे मेडिसिन. एखादेच डॉक्टर खूप क्वचितच भेटतील जे आवश्यक तेवढेच सांगतील. ओरबाडून खाणारे मात्र पायलीचे पन्नास मिळतील.बर एवढे पैसे देऊनही हॉस्पिटल मधील वागणूक अतिशय कनिष्ठ दर्ज्यांची असते. अगदी नाव लिहून घेणाऱ्या पासून सलाईन लावणाऱ्या पर्यंत व्यवस्थित बोलत नाहीत. वयस्कर व्यक्ती पाहूनही यांच्या अंगी नम्रता नसते. उलट हेच म्हणतात आम्हला रोजच काम असे म्हणावे वाटते की आम्ही तर रोज येत नाही ना तुमच्या कडे जरा तर वयाचे भान ठेवा. आज हि आपण डॉक्टरकडे खूप आदराने पाहतो. देवा नंतर डॉक्टर च आहे असे म्हणतो. आपण जन्मदाता देवाला म्हणतो तर तर तारणहर्ता डॉक्टर ला समजतो आता हा डॉक्टर मारनकर्ता झाला आहे. हो आता असेच झाले आहे. पेशन्टला जीव असेपर्यंत वारेमाप बिल करून आणि वाटेल तशी ट्रीटमेंट देऊन अर्धमेल करायचं अन पेशंट मेला तरी त्याच्या टाळू वरच लोणी खायला तयारच. सगळ्यात जास्त भ्रष्ट झालेली यंत्रणा म्हणजे हॉस्पिटल.पेशन्ट आणि पैसा म्हणजे त्यांच्या साठी खेळच.अगदी खेळच म्हणावे लागेल. पेशन्ट वाचला तरी अफाट पैसे आणि पेशंट मेला तरी पैसे वारेमाप. वाटेल तसे आयुष्याशी खेळायचे.बर हे लोक इथेच थांबत नाहीत यांना दाही दिशा परत खायचे असते. प्रत्येक गोष्टीतून पैसे घेतात मेडिकल वाल्याशी यांची हातमीळवणी असतेच, तर पॅथॅलाजी चे यांच्याशी कटींग वाली भाषा असते. एक्सरे, चठख अजून काय नानाविध तपासण्या या सर्वातून यांची कमाई अफलातून असतेच.सामान्य माणसाच्या आवक्या बाहेरील गोष्टी आहेत. किती ओरबडाल रे पेशंट ला. थोडीशी तरी बाळगा. आपण या समाजाचे खूप मोठे घटक आहात हे लक्षात घ्या.तुम्ही डॉक्टर झाल्यावर जी शपत घेतात ती तर आजकाल फॅशन म्हणून घेता ती शपत मनावर घेऊन किंवा ती शपत एक जबाबदारी आहे असे समजणें च डॉक्टर लोक विसरून गेले. त्या शपते साठी इमान जागा करा.प्रत्येक डॉक्टर म्हणजे



**संपर्क रुपाली देशपांडे**
**८८८८९५५५३९**

कोणताही जनरल फिजियेशन असो, स्त्रीरोगाचे डॉक्टर, बालरोगतज्ञ,त्वचा रोग, सर्वात अजून काय काय डॉक्टर लोकांची ची भली मोठी लिस्ट आहे. भयानक म्हणजे स्त्रीरोग तज्ञ आणि हाडाचे डॉक्टर तसेच दातांचे डॉक्टर. कमालीचे मायाजाळ साठून ठेवण्यात पटाईत. जन्म आणि मृत्यू अटळ आहे म्हणतात तर लहान बाळ जन्मला घालायच्या आधीच यांची जय्यत तयारी असते पेशन्ट ची डिलेव्हरी नॉर्मल करायची की सिजरिंग हे सगळे स्त्रीरोग तज्ञब ठरवतात. जन्म अटळ असल्यामुळे यांचे पैसे हि तेवढेच अटळआहेत. हाडाचे डॉक्टर म्हणजे एनी टाईम मनी असणारे डॉक्टर कारण म्हातारे माणसे पडायचे काही थांबत नाही,तरुण मंडळी सुद्धा अपघात, लचकणे मुरगळणे हे चालायचेच त्या मुळे या पेशन्ट ची अफाट गर्दी कमी नाही त्या मुळे यांच्या पैशाला हि कमी नाहीं. सर्वात भयानक म्हणजे दातांचे डॉक्टर.एक दात आता एक लाखात झाला, असा विचार येतोय की यांना कसे जमते हे सर्व हे. अगदी बिजनेस च झाला. डॉक्टर की पाहूनअस म्हणावं वाटत की डॉक्टर की हा पेशा आहे. धंदा नाही. दात एवढा महाग ऐकूनच ऐकूनच दातखीली बसायची वेळ आली. खरंतर डॉक्टर लाईन मध्ये खूप बोलण्या सारखे आहे आणि सामान्य माणसाला वाटत इतके सोज्वळ राहिलेले नाही आतमध्ये प्रचंड मोठी भ्रस्ट यंत्रणा आहे.यांच्यात हि टक्के, कमिशन, कटींग असे भरपूर आहे. मला एवढेच म्हणायचे आहे. डॉक्टर लोकांनो आम्ही सर्वसामान्ये माणसे तुम्हला एवढीच विनंती करतो की माणसाचा जीव परतवाणारे तुम्ही जीव घेऊ नकात आणि कंबरडे मोडूस्तर पैसाही घेऊ नकात. काही वेळेला तुमचे बिल भरताना खूप कष्टाने पैसे जमविले असतात कधी सोन विकून, तर कधी व्याजाने आणून तर कधी शेती जुमला विकून तो पैसा तुमच्या कडे येत असतो पेशन्टचा जीव वाचेल एवढेच घ्या. वारेमाप पैसे घेऊन कुणाची हाय खाऊ नका. तुमच्या बद्दलचा आदर समाजात कायम टिकूदया. पांढऱ्याशुभ्र तुमच्या गणवेशला कसलाच काळमिा नको लागायला.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार ८ डिसेंबर २०२४
https://lokaarambh.com



# नियम बाह्य संघटनेचा आणि विश्वकर्मा सुतार समाज संघटनेचा संबंध नाही

## - स्वयंघोषित संघटन काढून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न - तालुकाध्यक्ष परमेश्वर पांचाळ



माजलगांव, (प्रतिनिधी) –: मागील दोन दिवसांपूर्वी वर्तमान पत्रातून प्रभु विश्वकर्मा संघटनेच्या तालुकाध्यक्ष पदी शामसुंदर पांचाळ यांची निवड झाल्याचे प्रकाशित झालेले वृत्त चुकीचे असून नियम बाह्य संघटनेचा आणि विश्वकर्मा सुतार समाज संघटनेचा संबंध नसुन स्वयंघोषित संघटन काढून समाजात फूट पाडण्याचा प्रयत्न असल्याचे विश्वकर्मा सुतार संघटनेचे अधिकृत माजलगांव तालुकाध्यक्ष परमेश्वर (आमसुले) पांचाळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे सांगितले आहे.

दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे कि, कुठल्याही संघटनेच्या पदाधिकारी निवडी अगोदर आधीच्या पदाधिकारी यांचे राजीनामे देणे बंधनकारक असते मात्र काही अतिउत्साही समाज बांधवांनी हे सर्वच नियम बाजूला सारून आपले वैयक्तिक हित पाहून आणि समाजात फूट पाडण्यासाठी थोडसं नाव बदल करून स्वयंघोषित संघटन काढून स्वतःच्या स्वार्थासाठी आणि इतर समाजाला विश्वासात न घेता अध्यक्ष झाल्याचा कांगोवा केला होणे ही बाब पूर्ण पणे समाज विरोधी आहे. त्या मुळे या स्वयंम घोषित संघटनेचा आणि श्री विश्वकर्मा सुतार समाज संघटनेचा जी संघटना केवळ आणि केवळ समाजाच्या सर्व अडीअडचणी साठी कार्यरत असते त्या संघटनेचा या अनधिकृत व स्वयंघोषित अध्यक्ष शामसुंदर पांचाळ यांचा काहीही संबंध नाही. या पदाधिकारी यांच्याशी कसल्या प्रकारचे आर्थिक व्यवहार करू नये असे आवाहन विश्वकर्मा सुतार संघटनेचे अधिकृत माजलगांव तालुकाध्यक्ष परमेश्वर (आमसुले) पांचाळ, उपाध्यक्ष राजेभाऊ पांचाळ, सचिव अशोक दिगांबरे, राजेभाऊ रिधोरीकर, लक्ष्मण पांचाळ, सुभाष नन्नवरे, संतोष रत्नपारखे, वैजनाथ पांचाळ, बालाजी पांचाळ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

# आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी घेतली आमदारकीची शपथ



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : लोहा–कंधार विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी शनिवारी विधानसभेच्या विशेष अधिवेशनात पहिल्याच दिवशी आमदारकीची शपथ घेतली.महायुतीला राज्यात दणदणीत यश मिळल्यानंतर नुकताच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा शपथविधी पार पडला. यानंतर विधानसभेतील सर्व नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधी शनिवार पासून सुरू झाला आहे.यासाठी विधानसभेचे विशेष तीन दिवशीय अधिवेशन बोलावण्यात आले आहे.पहिल्याच दिवशी शनिवारी अजितदादा पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे लोहा कंधार विधानसभा मतदारसंघाचे नवनिर्वाचित आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी आमदारकीची आणि गोपनीयतेची शपथ घेतली.मी प्रताप वत्सलाबाई गोविंदराव पाटील चिखलीकर विधानसभेचा आमदार म्हणून निवडून आलो असल्याने, कायद्याद्वारे स्थापित झालेल्या संविधानाबद्दल मी खरी श्रद्धाआणि निष्ठा बाळगेन.भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता उन्नत राखीन.आता मी जे कर्तव्य हाती घेणार आहे ते निष्ठापूर्वक पार पाडेन अशी शपथ त्यांनी ग्रहण केली.

# मराठा संवाद बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित रहावे -बापूसाहेब साळुंके

बीड । प्रतिनिधी राज्यातील तसेच तालुकास्तेरावरील मराठा समाजातील सर्व घटकांशी संवाद साधण्यासाठी अखिल भारतीय मराठा महासंघ संघटनेने मराठा संवाद बैठकीचे आयोजन आठ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी आयोजित केलेले आहे. तरी सदरील बैठकीला सर्व जिल्हा, शहर, तालुका आदी ठिकाणच्या सर्व पदाधिकारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन अखिल भारतीय मराठा महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंखे यांनी केले आहे. एक मराठा लाख मराठा संवाद बैठक आठ डिसेंबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न होणार असून या बैठकीमध्ये पक्ष संघटन बाबत काही सूचना व ठराव घेतले जाणार आहे. त्याचबरोबर प्रत्यक्ष काम करताना येणाऱ्या अडचणींवर या ठिकाणी हितगुज साधले जाणार आहे. तरी सर्व युवक महिला विभागीय जिल्हाध्यक्ष शहराध्यक्ष तालुकाध्यक्ष तसेच सरचिटणीस व पदाधिकारी यांनी सदरील बैठकीला मोठ्या संख्येने हजेरी लावावी असे आवाहन अखिल भारतीय मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंखे यांनी केले आहे. तसेच लवकरच सुरू होत असलेल्या नवीन वर्षाच्या सर्व कार्यक्रम आराखडा यावेळी संघटना या कार्यक्रमादरम्यान सांगणार असून या बैठकीवेळी कोणीही कोणतेही कारणे न देता मोठ्या संख्येने हजर रहावे अशी विनंती देखील बापूसाहेब साळुंके यांनी केली आह

# फडणवीस साहेब सत्ता स्थापन झाली आहे ; शेतकऱ्यांची कर्जमाफी करा - अभिजीत पवार

## शेतकऱ्यांच्या शेतीमालाला हमीभाव द्या आणि कर्जमाफी करा..



बीड प्रतिनिधी – ऐतिहासिक महाविजयानंतर महायुतीतील तिन्ही पक्षांनी निवडणूक काळात मतदारांना दिलेली आश्वासने पुर्ण करण्यास प्राधान्यक्रम द्यावा. विशेषत: शेतकऱ्यांना कर्जमाफी देवून बळीराजाला अस्मानी संकटातून बाहेर काढावे. निवडणूक लागल्यानंतर प्रचारा दरम्यान महायुतीच्या अनेक उमेदवारांनी आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी करू अशा घोषणा केल्या होत्या. आता सरकार स्थापन झाले आहे, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस साहेब शेतकऱ्यांचे लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावावे शेतकऱ्यांना कर्जमाफी द्या अशी मागणी अभिजीत पवार यांनी केली आहे. कोणतेही निकष व कोणत्याही अटी न लावता शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी द्यावी.

निवडणुकीला समोर जाण्यापूर्वी शिंदे सरकारने लाडकी बहिण योजना लागू केली होती. सरकार पुन्हा सत्तेत आले तर या योजनेतून महिलांना महिनाकाठी २,१०० रूपये देण्याचे आश्वासन दिले गेले होते, आणि शेतकऱ्यांना कर्जमाफी करू असे हे आश्वासन दिले होते, हे आश्वासन सरकारने तत्काळ पुर्ण करावे.योजनेच्या माध्यमातून राज्याच्या तिजोरीवर पडणारा ताण कमी करण्याचे आव्हान सरकार समोर राहणार असले तरी, आश्वासनांची पुर्तता करण्यावर सरकारने ठाम राहिले पाहिजे, असे मत पवार यांनी व्यक्त केले आहे.

**प्रचारादरम्यान दिलेले आश्वासन पूर्ण करा..**

राज्यातील शेतकरी संपूर्ण कर्जमाफीसोबतच सोयाबीन भावांतर योजना लागू करण्याची मागणी करत आहेत. त्याचं कारण भाजप आणि महायुतीनं सत्तेत आल्यानंतर कर्जमाफी देऊ, सोयाबीनसाठी भावांतर योजना राबवू असं आश्वासन शेतकऱ्यांना जाहीरनाम्यात दिलं होतं. आता महायुती सरकार सत्तेत आले आहे महायुती सरकारने दिलेले आश्वासन लवकरात लवकर पूर्ण करावी आणि शेतकऱ्यांना न्याय द्यावा. होणाऱ्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत शेतकरी कर्जमाफी आणि सोयाबीन भावांतरचा मार्ग मोकळा करा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. पहिल्या मंत्रिमंडळ बैठकीत महायुती सरकार दोन्ही निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलेलं आश्वासन पूर्ण करेल, अशी शेतकऱ्यांना अपेक्षा आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफीची गरज आहे. शेतकऱ्यांनी सोयाबीन हमीभावाच्या खाली विकलं आहे/ विकत आहेत. सरकारनं सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना तातडीनं भावांतर योजना लागू करावी. कारण सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचं जे नुकसान व्हायचं होतं ते झालं आहे. त्यामुळं भावांतर योजनेतून सोयाबीन उत्पादकांना दिलास देण्याचा निर्णय सरकारनं घ्यावा, आणि सरकारने लवकरात लवकर शेतकऱ्यांची कर्जमाफी सुद्धा करावी अशी मागणी अभिजीत पवार यांनी केली आहे.

# ७ जानेवारी रोजी भव्य मराठा वधूवर परिचय मेळावा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : मराठा वधूवर सूचक मंडळ नांदेडच्या वतीने २१ वा भव्य मराठा वधुवर परिचय मेळावा दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी,हनुमान मंदिर मंगल कार्यालय विजयनगर नांदेड येथे संपन्न होणार आहे. मागील २० वर्षापासून मंडळाच्या वतीने अगदी मोफत हा वधूवर परिचय मेळावा घेतला जातो. मराठा समाजातील विवाह इच्छूक वधूवरांना योग्य व अनुरूप असा जोडीदार निवडता यावा याच भूमिकेतून हा परिचय मेळावा प्रतिवर्षी घेतला जातो. यावर्षीचा मेळावा ७ जानेवारी २०२५ ला सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यात नवनिर्वाचित खासदार, आमदार यांचा हृदय सत्कार मंडळाच्या वतीने करण्यात येणार आहे. मेळाव्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून सर्वपक्षीय नेते, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, प्रशासकीय अधिकारी आदी गणमान्य मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले आहे. समाजाचा वेळ,पैसा, श्रम वाचावेत हीच प्रमुख भूमिका या मेळाव्याच्या आयोजनाच्या पाठीमागे आहे. मराठा समाजाची सध्याची परिस्थिती पाहता अशा वधूवर परिचय मेळाव्याची समाजाला नितांत गरज आहे. समाजाची ही सध्याची गरज लक्षात घेऊन मागील दोन दशकापासून मराठा वधूवर सूचक मंडळ हा उपक्रम मोफत राबवित आहे.समाजबांधवही यासाठी चांगला प्रतिसाद देत आहे. विवाह इच्छुक वधूवरांनी व त्यांच्या पालकांनी आपल्या पाल्याच्या परिचयपत्रासह पूर्व नोंदणी हनुमान मंदिर मंगल कार्यालय विजयनगर नांदेड येथे करावी,असे आवाहन मंडळाचे संस्थापक कार्याध्यक्ष संभाजीराव शिंदे,सचिव प्रा.संतोष देवराये,उपाध्यक्ष इंजि. तानाजीराव हुस्सेकर,दिगंबरराव कदम,कोषाध्यक्ष अँड.एल.जी.पूयड, सभासद शिवाजीराव खुडे,सौ. राजश्रीताई हेमंत पाटील सौ कल्पनाताई डोंगळीकर आदींनी केले आहे.

# चिंचोटी येथे नैसर्गिक सेंद्रीय शेतीचे प्रशिक्षण संपन्न

## जिवअमृत तयार करण्यासाठी शेतकऱ्यांना बॅलरचे वाटप



वडवणी । प्रतिनिधी जागतिक मृदा दिनानिमित्त चिंचोटी येथे डॉ.पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन योजने अंतर्गत सेंद्रिय गटाचे गावपातळीवर प्रशिक्षण घेण्यात आले.या प्रशिक्षणास मार्गदर्शन करण्यासाठी माजलगाव उपविभागीय कृषी अधिकारी श्रद्धा भवारी मॅडम, कृषी विकास अधिकारी श्री साहिल सय्यद सर, जिल्हा मृद चाचणी प्रयोगशाळा प्रमुख श्री सहदेव पाटील उपस्थीत होते. उपस्थीत मान्यवरांच्या शुभ हस्ते दशपर्णीअर्क जिवअमृत तयार करण्यासाठी २०० लिटरच्या बॅलरचे शेतकर वाऱ्यांना वाटप करण्यात आले. सविस्तर वृत्त असे की ५ डिसेंबर हा मृदा दिन म्हणुन साजरा करण्यात येतो.त्या निमीत्ताने वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे नैसर्गीक सेंद्रीय शेतीचे प्रशिक्षणात शेंद्रीय शेती विषयी शेतकर्यांना माजलगाव कृषी विभाग ऊप विभागीय अधिकारी श्रद्धा भवारी मॅडम या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणुन लाभल्या होत्या त्यांच्या समवेत कृषी विकास आधीकारी साईल सय्यद,मृद शाळा प्रमुख सहदेव पाटील ता कृ अ भुजंगराव खेडकर,कृ प ठोंबरे साहेब,कृ प वेक्षक जाधवर,आत्माचे ए टी एम सुदर्शन आंधळे अदीं मान्यवरांनी शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.या वेळी शेंद्रीय शेती करण्यास शेतकऱ्यांना दशपर्नीअर्क व जीवअमृत तयार करण्यासाठी २०० लिटरच्या बॅलरचे वाटप करण्यात आले. यावेळी श्रद्धा भवारी मॅडम आपल्या भाषणात म्हणाल्या की सध्याच्या रासानिक खतांच्या,किरनाशकांचा जास्त वापरा मुळे मानवी जिवनावर मोठा परीणाम होत आहे.यामधून कॅन्सर सारख्या भयानक आजाराला सामोर्य जावे लागत आहे.यावर एकच उपाय म्हणजे आपल्याला सेंद्रीय शेती करणे.पुर्वी सारखे गावरान खाद्य शेतीत पिकवणे काळाची गरज आहे.यामध्ये आपण घरच्या घरी कमी खर्चात सेंद्रीय शेती करण्यासाठी शेन खत,कंपोस्ट खत,गांडुळ खत,गोमुत्र,दसपर्नी अर्क,डि कंपोज,जिव अमृत यासारखी शेतीसाठी लागणारे घटक आपण तयार करु शकतो.या दिलेल्या बॅलर मध्ये पाणी न साठवता दशपर्णी अर्क व जीवामृत तयार करावे असे यावेळी त्यांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी, मंडळ कृषी अधिकारी टोम्पे साहेब, कृषी पर्यवेक्षक खराडे साहेब,आत्माचे ए टी एम सुदर्शन आंधळे,कृषी सहाय्यक कोठुळे साहेब कृ सा भुजबळ साहेब,कृ सा तिडके साहेब,कृ प इंगळे साहेब,कृ प तारकर,पशुवैद्यकिय अधीकारी तांदळे साहेब,ग्राम विकास अधिकारी सत्यवान कशिद,सरपंच भागवत गोंडे,विधाका शेतकरी कंपनीचे अध्यक्ष धनपाल काका गोंडे यांच्यासह शेतकरी बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमचे सुत्र संचलन ठोंबरे साहेब यांनी केले तर उपस्थीत मान्यवर व शेतकरी बांधवांचे आभार सुमंत (मुन्ना) गोंडे यांनी मानले.

# आदित्य महाविद्यालयाचे विद्यार्थी जिल्ह्यातली सर्व शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची दंत तपासणी करणार

## पहिल्याच दिवशी ४८५ विद्यार्थ्यांची तपासणी, ५६ विद्यार्थ्यांवर पीट अँड सिलेंट उपचार

आदित्य शिक्षण संस्थेत मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्रजी सारडा, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी च्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली नेहमीच विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आणि उज्वल भावी आयुष्यासाठी विविध उपक्रम राबवले जातात. आता आदित्य दंत महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम अंतर्गत पिट अँड फिशर सिलेंट प्रोग्राम जिल्हाभर राबवला जाणार असून आठवड्यातील दोन दिवस आदित्य दंत महाविद्यालयाचे विद्यार्थी शाळेत जाऊन विद्यार्थ्यांची तपासणी करत त्यांच्यावर उपचारही करणार आहेत. गुरूवारी याचा शुभारंभ जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालीका डॉ. आदिती सारडा यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय उच्च माध्यमिक व माध्यमिक विद्यालय बीड येथे झाला. यावेळी पहिल्याच दिवशी ४८५ विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली. त्यामधील ५६ विद्यार्थ्यांवर पीट अँड सिलेंट उपचार विद्यार्थ्यांनी तत्काळ केले. शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये दंत समस्या मोठ्या प्रमाणात आढळून येत आहेत. या संदर्भात जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अशोक थोरात यांनी नॅशनल ओरल हेल्थ प्रोग्राम आदित्य दंत महाविद्यालयाच्या सहकार्याने जिल्ह्यात राबवण्याचा संकल्प केला आहे. याची सुरूवात गुरूवारी झाली. आदित्य महाविद्यालयाच्या वतीने आठवड्यातून दोनदा जिल्ह्यातील शाळेत जाऊन त्या ठिकाणी विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून कॅरीज फ्री बीड बनवण्याचा संकल्प डॉ.अदितीजी सारडा व डॉ. अशोक जी थोरात यांनी या केला. कार्यक्रमात शाळेच्या वतीने चौधरी सर व आदित्य दंत महाविद्यालयाच्या वतीने डॉ, हिमांशुजी श्रीवास्तव, डॉ. मंगेश अंधारे यांनी व जिल्हा रुग्णालयाच्या वतीने डॉ. सत्येंद्र दबाडगावकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. आभार राम गायकवाड मानले.





# नाटकबाजी बंद करा, आता:, नव्या सरकार वर जरांगे पाटील कडाडले

## शपथविधीवर प्रतिक्रिया देताना मनोज जरांगे यांनी नव्या सरकारला थेट इशारा दिला आहे.

**प्रतिनिधी**

गुरुवारी नव्या सरकारचा शपथविधी पार पडला. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रिपदाची तर अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान आता या शपथविधीवर प्रतिक्रिया देताना मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी थेट सरकारला इशारा दिला आहे. त्यांनी कायद्याप्रमाणे शपथ घेतली, तिघांना शुभेच्छा देतो. आमच्याकडून तिघांचं अभिनंदन, पण आता नाटकबाजी बंद करायची अनब मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडवायला सुरुवात करायची असा इशारा यावेळी मनोज जरांगे



पाटील यांनी दिला आहे. तसेच मंत्रिमंडळाचा विस्तार झाल्यानंतर आम्ही सामूहिक आमरण उपोषणाची तारीख जाहीर करू असं देखील मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे.
मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावणार असं फडणवीस म्हटले असतील तर चांगली गोष्ट आहे. लोकं तुम्हाला डोक्यावर घेऊन नाचतील, समाज तुमचं अभिनंदन करेल असं जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. आम्ही आमच्या उपोषणावर ठाम आहोत, मंत्रिमंडळाचा विस्तार झाला की आम्ही आमच्या उपोषणाची तारीख जाहीर करू असंही मनोज जरांगे पाटील यांनी म्हटलं आहे. मराठा

### नेमकं काय म्हणाले जरांगे पाटील ?

कायद्याप्रमाणे त्यांनी शपथ घेतली, तिघांना शुभेच्छा आहेत अशी प्रतिक्रिया मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या शपथविधीवर दिली आहे. पुढे बोलताना ते म्हणाले की, आमच्याकडून तिघांचं अभिनंदन, मराठा आरक्षणाच्या प्रश्नासाठी आता सुरुवात करा नाटकबाजी बंद करा. मंत्रीमंडळाचा विस्तार झाल्यानंतर आम्ही सामूहिक आमरण उपोषणाची तारीख जाहीर करू, समाजाला सांभाळायला शिका, जनतेने तुम्हाला निवडून दिलं आहे. तुम्ही जनतेचं मन जिंकण्याचं काम करा.

समाजाला आरक्षण मिळावं यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी मोठा लढा उभारला. त्यांच्या आंदोलनानंतर सरकारनं मराठा समाजासाठी स्वतंत्र आरक्षणाला मंजुरी दिली. मात्र आम्हाला ओबीसीमधूनच आरक्षण पाहिजे या मागणीवर अद्यापही मनोज जरांगे पाटील ठाम आहेत, आता ते पुन्हा एकदा आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत.

# महाविकास आघाडीत महाभूकंप: समाजवादी पार्टी आघाडीतून बाहेर पडणार?; गंभीर आरोप काय?

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाला. त्यानंतर आता महाविकास आघाडीतील मित्र पक्षाने महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. विधिमंडळाचं विशेष अधिवेशन सुरु आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीतील मित्रपक्ष असणा–या समाजवादी पार्टीने साथ सोडली आहे. शिवाजीनगर– मानखुर्द विधानसभा मतदारसंघाचे आमदार अबू असीम आझमी यांनी टीव्ही ९ मराठीशी बोलताना ही घोषणा केली आहे. तसंच यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव का झाला? यावरही अबू आझमी यांनी प्रकाश टाकला आहे.

**अबु आझमी काय म्हणाले?**

महाविकास आघाडीमध्ये समन्वय नव्हता. कोणत्याही प्रकारचा समन्वय महाविकास आघाडीमध्ये या निवडणुकीत पाहायला मिळाला नाही. कोणत्याही निवडणुकीला आघाडी म्हणून सामोरं जात असताना एकवाक्यता गरजेची आहे. कोणत्याही पक्षाचा नेता निवडणूक लढत असेल तर त्याला आपला नेता– उमेदवार समजलं गेलं पाहिजे. पण कोणत्याही प्रकारचा समन्वय नव्हता, असं अब आझमी म्हणालेत.यंदाच्या निवडणुकीत महाविकास आघाडी पराभूत का झाली? यावर आझमी यांनी भाष्य केलं. महाविकास आघाडीचे नेते एकमेकांच्या उमेदवारांच्या मंचावर प्रचारासाठी दिसले नाहीत. खूप कमी वेळा हे चित्र पाहायला मिळालं. जागा वाटपावेळी रस्सीखेच पाहायला मिळाली. याचमुळे महाविकास आघाडीचा पराभव झाला, असं अबू आझमी यांनी सांगितलं.
अबू आझमी यांनी शिवसेनेच्या आणि विशेष करून उद्धव ठाकरे यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण केलं आहे. विधानसभेची निवडणूक हारल्यानंतर त्यांनी असं म्हटलं की आमचा हिंदुत्वाचा मुद्दा कायनम असेल. सगळ्या धर्माच्या लोकांना सोबत घेऊन चालण्याचा विचार उद्धव ठाकरे यांनी मांडला नाही. त्यामुळे आमचा त्या भूमिकेला विरोध आहे. आता काँग्रेस आणि राष्ट्रवादीने ठरवायचं की त्यांना शिवसेनेसोबत राहायचं की नाही, असं अबू आझमी म्हणाले आहेत.
अबु आझमी यांनी घेतली आमदारकीची शपथ
विधानसभा निवडणुकीतील निकालावर महाविकास आघाडीकडून संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीच्या नवनिर्वाचित आमदारांनी आमदारकीची शपथ घेतली नाही. पण अबू आझमी यांनी मात्र विधानसभेच्या सदस्यत्वाची शपथ घेतली आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीनंतर महाविकास आघाडीत आता फूट पडली आहे. अबू आझमी आणि भिवंडी पूर्व मतदारसंघाचे आमदार रईस शेख हे महाविकास आघाडीतून बाहेर पडल्याने महाविकास आघाडीचं संख्याबळ २ ने कमी झालं आहे.

# जिल्ह्याला लागलेला ऊसतोड मजुरांचा डाग पुसण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांना मंत्री करा- राजेश कुडके



गोकुळ इंगोले : पुष्पा झुकेगा नहींपण मन वळवणार हे नक्की. अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्ना स्टारर मपुष्पा २फ ने बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई कमाई आहे. या चित्रपटाने रिलीजच्या पहिल्याच दिवशी मोठ्या चित्रपटांचे रेकॉर्ड उद्धस्त केले आहेत. मपुष्पा २फच्या झंझावातापुढे ऑस्कर विजेत्या चित्रपट आरआरआरनेही शरणागती पत्करली आहे. सगळीकडे फक्त मपुष्पा २फचे नाव ऐकू येत आहे. भारतीय सिनेसृष्टीच्या इतिहासात जे काही इतर चित्रपट करू शकले नाही, ते या चित्रपटाने केले आहे. अल्लू अर्जुनच्या चित्रपटाने जगभरात आपली छाप पाडली आहे. याने पहिल्याच दिवशी जगभरात ३०० कोटी रुपयांची कमाई केली आहे. हे आकडे ऐकल्यानंतर अल्लू अर्जुन आणि दिग्दर्शक सुकुमार यांच्या आनंदाला पारावार उरला नाही.

# माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या वाढदिवसा निमित्त बोरखेड विद्यालयात प्रश्नमंजुषा स्पर्धा

आदर्श शिक्षण संस्था बीड, संचलित बोरखेड माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकनेते महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्तजी अण्णा क्षीरसागर यांच्या ७४ व्या वाढदिवसानिमित्त विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री जोगदंड सर यांच्या अध्यक्षतेखाली प्रश्नमंजुषा स्पर्धा दि. ५/ १२/२०२४ गुरुवार रोजी उत्साहात संपन्न झाली. मान्यवरांच्या हस्ते लोकनेत्या खासदार स्वर्गीय सौ. केशर काकू क्षीरसागर व सोनाजीराव क्षीरसागर यांच्या पावन प्रतिमांचे पूजन संपन्न झाले. प्रश्नमंजुषा स्पर्धेत पाचवी ते सातवी या गटात वर्ग पाचवीच्या बोराटे श्रेया वैष्णवी गावडे यांचा गट विजयी झाला. व आठवी ते दहावी या गटात वर्ग आठवीचे बोरगे गणेश, चिरंजीव भोईटे विजयी झाले. प्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक श्री जोगदंड सर यांनी लोकनेते आणि जयदत्तजी अण्णा क्षीरसागर



यांचे सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कार्य याविषयी सर्व विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. प्रसंग विद्यालयातील सर्व शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होत

# एस.के.एच.वैद्यकिय महाविद्यालय येथे दिव्यांग शिबीराचे आयोजन

**जगप्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ञ कै.डॉ प्रफुल्ल विजयकर यांच्या संकल्पनेतून आणि आधारस्तंभ माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्या प्रेरणेतून २००९ पासून सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकिय महाविद्यालय बीड येथे मतिमंद, गतिमंद, सेरेब्रल पल्सी कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार, झटके येणे अशा विविध प्रकारच्या आजारांवर होमिओपॅथिक औषध-उपचार शिबीर आयोजित होत आहेत. आतापर्यंत जवळपास ५००० हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे. हे शिबिर दर तीन ते चार महिन्यांच्या अंतराने नियमितपणे आयोजित होत आहेत. होमिओपॅथिक चिकित्सा पद्धतीच्या सिद्धांतानुसार रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध उपचार केले जातात. हे शिबिर दि. ०८ डिसेंबर २०२४ (वेळ: सकाळी ८.००) रोजी होणार आहे. ज्या रुग्णांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी मुळी ९५०३८७५३११ (सोशल वर्कर, बीड) यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गोशाल, उपप्राचार्य गणेश पांगरकर, डॉ.अमित भस्मे, डॉ.रत्ना क्षीरसागर, डॉ.शेख नासेर यांनी दिली.**

# अजितदादांना कोर्टाकडून मालमत्तेसंदर्भात दिलासा, गुणरत्न सदावर्ते यांची पहिली प्रतिक्रिया

गुरुवारी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. नव्या मंत्रिमंडळामध्ये अजित पवार यांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. दरम्यान त्यानंतर लगेचच शुक्रवारी अजित पवार यांना दिलासा देणारी मोठी बातमी समोर आली. ती म्हणजे आयकर विभागाकडून जप्त करण्यात आलेली अजित पवार यांची मालमत्ता दिल्ली ट्रिब्यूनल कोर्टाच्या आदेशानंतर मुक्त करण्यात आली आहे. एवढंचं नाही तर अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याशी संबंधित मालमत्ता देखील कोर्टाने मुक्त केली आहे. कोर्टाच्या या निर्णयावर ज्येष्ठ वकील गुणरत्न सदावर्ते यांनी प्रतिक्रिया दिली आहे.नेमकं काय म्हणाले सदावर्ते?
आपण एक लक्षात घेतलं पाहिजे, की प्रत्येक भारतीय नारिकाला अधिकार असतो. एखाद्या विषयाच्या चौकशीची मागणी करण्याचा. त्या अनुषंगाने किरीट सोमय्याजींनी अर्ज केला असेल. त्यावर तथ्य पडताळून पाहिल्यानंतर आपले ट्रिब्युनलचे माननीय न्यायमूर्ती भंडारी यांनी निकाल दिला. अजित पवार यांना बेनामी मालमत्तेसंदर्भात क्लीन चीट देण्यात



आली. मला असं वाटतं तो न्यायालयाचा निर्णय आहे. त्यामुळे न्यायालयाच्या निर्णयावर चुकीच्या पद्धतीनं बोलणं किंवा राजकारण करणं मला योग्य वाटत नाही. ते राज्यघटनेला देखील अभिप्रेत नाही. संविधानिक भूमिकेच्या विरुद्ध जाऊन यामध्ये काही घडलं असं मला वाटत नाही असं यावेळी सदावर्ते यांनी म्हटलं आहे.दरम्यान अजित पवार यांना आयकर विभागाकडून जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेसंदर्भात दिल्लीतील कोर्टाकडून दिलासा मिळाला आहे. याबाबत राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांना देखील प्रश्न विचारण्यात आला. मात्र त्यांनी यावर बोलणं टाळलं आहे. मला त्याबाबत माहिती नाही असं त्यांनी म्हटलं आहे. विरोधकांकडून ईव्हीएमवर शंका उपस्थित करण्यात येत आहे, यावर देखील त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. निवडणुका बॅलेट पेपरवर घ्याव्यात अशी आमची मागणी आहे. जर एकदा निवडणुका बॅलेट पेपरवर झाल्या तर काय अडचण आहे. आम्ही याविरोधात कोर्टात जाणार की नाही जाणार हे येत्या सोमवारी स्पष्ट होईल असंही यावेळी सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com